महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ २० सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक - ०८८ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत ०२ रुपये

## लक्षवेधी



## त्रिभाषा सूत्र लागू करण्यास काँग्रेसचा ठाम विरोध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : देशात केवळ जम्मू-काश्मीर आणि लडाख या दोनच केंद्रशासित प्रदेशांमध्ये लागू आहे. त्रिभाषा सूत्र पहिलीपासून लागू करायचे की कोणत्या इयत्तेपासून करायचे, याबाबत समिती राज्यभरातील जनतेचा कौल ऑनलाइन पद्धतीसह विविध माध्यमांतून अजमावणार असल्याचे असे प्रतिपादन राज्य सरकारने यासंदर्भात नियुक्त केलेल्या समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव यांनी केले आहे. त्यावर आता महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. राज्य सरकार तिसरी भाषा लादण्याचा प्रयत्न करत असून, त्यास काँग्रेसचा ठाम विरोध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ठाणे महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने ठाणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने गुरुवारी संघटनात्मक आढावा बैठक गडकरी रंगायतन येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला उपस्थित असलेले महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बैठकीआधी पत्रकारांशी संवाद साधत राज्य सरकार तिसरी भाषा लादण्याचा प्रयत्न करत असून, त्यास काँग्रेसचा ठाम विरोध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## आशिष दामलेंच्या रूपाने ठाणे जिल्ह्याला नवा मंत्री




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : राज्याच्या परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले यांच्या रूपाने ठाणे जिल्ह्याला नवा मंत्री मिळाला आहे. राज्य सरकारच्या नियोजन विभागाने १६ सप्टेंबर रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार दामले यांना मंत्रिपदाचा दर्जा आणि संबंधित सोयी-सुविधा देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे, महामंडळाचे अध्यक्ष हे पदसिद्ध राज्यमंत्री असतात, मात्र दामले यांना थेट कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा बहाल करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या नियुक्तीबाबत राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. महायुती सरकार स्थापन झाल्यानंतर विविध महामंडळांचे वाटप करण्यात आले. ब्राह्मण समाजासाठी महत्त्वपूर्ण असलेले परशुराम आर्थिक विकास महामंडळ राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाट्याला गेले. बदलापूरचे आशिष दामले हे अजित पवार यांचे निकटवर्तीय मानले जातात आणि त्यांची निवड गुपचूपपणे झाल्याने महायुतीतील इतर पक्ष आश्चर्यचकित झाले होते. नियुक्तीनंतर दामले राज्यभर फिरून महामंडळाचे काम पाहत होते.

# ... तर मंत्रिपद सोडावं लागेल!

## उपमुख्यमंत्री अजित पवारांनी टोचले पक्षातील नेत्यांचे कान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नागपूर / दि. 19**

बऱ्याचदा मंत्री वेगवेगळ्या जिल्ह्यात जातात. तिथे पक्षातील जिल्हाध्यक्षाला विचारत नाहीत, त्यांच्याकडे पाहतही नाहीत. त्यांच्याशी बोलत नाही. तो आपल्या परिवारातील घटक आहे त्यामुळे असं वागू नका. आपल्याला तसं करून चालणार नाही. माझ्यासह सगळ्यांना ज्या काही छोट्या मोठ्या चुका होत असतील त्या दुरुस्त कराव्या लागतील, नाहीतर खुर्ची खाली करावी लागेल अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पक्षातील मंत्र्यांचे कान टोचले आहेत.



नागपूर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं चिंतन शिबिर पार पडले. या शिबिरात अजित पवार म्हणाले की, प्रत्येकाने वेळेला महत्त्व दिले पाहिजे. वेळेत कार्यक्रमाला आले पाहिजे. पुढच्या वेळी ठरलेल्या वेळेत कार्यक्रम सुरू व्हायला हवा. कार्यक्रमस्थळी दरवाजा बंद करावा का असा विचार सुरू आहे. विमानासारखे टेक ऑफ व्हायच्या दरवाजा बंद करून टाकतात. कुणाला किती गांभीर्य आहे हे एकदा कळू द्या. एक दिवस तुम्हाला वेळेत या सांगितले तरी काहींना त्रास होतो. सत्ता आणि पदांसाठी आपण पाऊल उचललं नव्हते तर महाराष्ट्राला स्थिरता, प्रगती आणि ठोस निर्णयांची गरज आहे म्हणून आपण हा मार्ग स्वीकारला आहे असं त्यांनी सांगितले. तसेच आठवड्याचे ३ दिवस मुंबईत आणि बाकीचे दिवस मतदारसंघात असतात. मंत्र्यांनी पक्षासाठी वेळ द्यायला हवा. जर पक्षापेक्षा काही मंत्र्यांना इतर कामे जास्त असतील तर ते पद आपण मोकळे करूया, ते दुसऱ्या कुणाला तरी देऊया. नुसते शिबिर घेऊन चालणार नाही. या शिबिरात जे निर्णय होतील त्यांची अंमलबजावणी करणार आहे. संघटना संघटनेचे काम करेल. काही गोष्टीत बदल करायच्या आहेत. पूर्वीच्या राजकारणात आणि आत्ताच्या राजकारणात जमीन अस्मानचा फरक आहे. सोशल मिडिया सक्रीय आहे. एखाद्या बाबींत मागचे पुढचे बाजूला करून काही क्लिप दाखवून ट्रोल केले जाते. काही कामे करत नाहीत त्यांना प्रसिद्धी मिळते. काही कामे करतात परंतु त्यांना प्रसिद्धी मिळत नाही असंही अजित पवारांनी सांगितले

दरम्यान, ज्यांना ज्यांना ज्या जिल्ह्याचं पालकमंत्रिपद मिळाले आहे. त्यांना त्या त्या जिल्ह्यात जावे लागेल. फक्त १ मे, १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी तेव्हाच जायचं असं नाही. त्या दिवशी जावेच लागेल त्याव्यतिरिक्त जिल्ह्यात काम करावे लागेल. तिथले जिल्हाधिकारी, प्रमुख आमदार, खासदार यांना सोबत घेऊन आपल्याला लोकांमध्ये फिरावे लागेल असंही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सूचना दिल्या.




## लाडक्या बहिणींना ई -केवायसी बंधनकारक !

### दोन महिन्यांची मुदत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्राच्या सर्वात महत्त्वाकांक्षी योजना असलेल्या लाडकी बहीण योजनेबाबत एक मोठी आणि महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. लाडकी बहीण योजनेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आणि गैरप्रकार तसेच घुसखोरी टाळण्यासाठी महाराष्ट्र सरकारने एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र महिला लाभार्थ्यांसाठी ई-केवायसी प्रक्रिया करणे बंधनकारक करण्यात आले आहे. याबाबतचे परिपत्रक महिला व बाल विकास विभागाने जारी केले असून, पुढील दोन महिन्यांमध्ये ही प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. आधार कायद्यातील तरतुदींनुसार, कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी आधार प्रमाणीकरण करणे आवश्यक असते. त्यामुळे आता मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी देखील लाभार्थ्यांची पडताळणी ई-केवायसीच्या (e-KYC) माध्यमातून केली जाणार आहे. यामुळे, योजनेच्या लाभासाठी पात्र नसलेल्या व्यक्तींना वगळण्यास मदत होईल आणि योजनेचा लाभ फक्त गरजू महिलांपर्यंत पोहोचेल याची खात्री होईल.

# पालिका अधिकाऱ्यांना दंड लावा !

## खड्ड्यांबाबत उच्च न्यायालयाचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
दि.19 मुंबई

मुंबई महानगर परिसरात खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातांची गंभीर दखल घेत उच्च न्यायालयाने मृत आणि जखमींच्या नातेवाइकांना नुकसानभरपाई देणारे धोरण तयार करण्याच्या सूचना राज्य सरकार आणि सर्व पालिकांना केली.

तसेच अपघातांसाठी कंत्राटदारांना जबाबदार धरून त्यांच्यासह संबंधित पालिका अधिकाऱ्यांच्या पगारातून दंडाची रक्कम वसूल करण्याचेही आदेश न्यायालयाने दिले.

रस्त्यांच्या देखभाल-दुरुस्ती आणि खड्डे बुजवण्याबाबत विविध प्राधिकरणांकडून एकमेकांवर जबाबदारी ढकलल्याच्या कृतीवरही न्या. रेवती मोहिते-डेरे आणि न्या. संदेश पाटील यांच्या खंडपीठाने नाराजी व्यक्त केली. राज्यातील खड्डयांमुळे झालेले मृत्यू आणि जखमींसाठी धोरण आणता येऊ शकते का, कंत्राटदारांना त्यांच्या कृतींसाठी जबाबदार धरावे. तसचे पालिका अधिकाऱ्यांच्या पगारातून दंडाची रक्कम वसूल करावी.

हा दंड किरकोळ नसावा. त्यांना अद्दल घडली पाहिजे, असेही खंडपीठाने सुनावले. तसेच पालिका अधिकाऱ्यांना निकृष्ट कामासाठी कंत्राटदारांना जबाबदार धरण्यास आणि त्यांच्या अधिकार क्षेत्रातील खड्डे एका आठवड्यात दुरुस्त करण्याचे आदेश देऊन सुनावणी तहकूब केली.




तुम्ही बांधलेल्या रस्त्यांवर एकाच पावसात खड्डे का पडतात, कंत्राटदारांवर तुम्ही काय कारवाई करता, अशी विचारणा खंडपीठाने केली. गेल्या काही वर्षात एकही खड्डा पडला नाही असा रस्ता दाखवा, असे न्यायालयाने विचारले असता उच्च न्यायालयाबाहेर, असे मिश्किल उत्तर साखरे यांनी दिले.

### सहा जणांनी गमावला जीव

पावसाळ्यात मुंबई आणि एमएमआरमध्ये खड्ड्यांमुळे सहा मृत्यू झाल्याची माहिती न्यायालयाला दिली. त्यात भिवंडी-निजामपूरमध्ये तीन आणि ठाणे, कल्याण आणि मुंबईत प्रत्येकी एकाचा मृत्यू झाल्याचे सांगितले. राज्यात आतापर्यंत १२ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती देण्यात आली.

# संजय राऊतांना घरात घुसून मारु

## आमदार राजेश मोरेंच्या नेतृत्वाखाली राऊतांविरोधात कल्याण डोंबिवलीत आंदोलन

डोंबिवलीत झालेल्या या प्रचंड निषेध सभेने दाखवून दिले की शिवसैनिक धर्मवीरांच्या नावावर अन्याय,अपमान सहन करणार नाहीत. डोंबिवलीत आज मोठ्या संख्येने शिवसैनिक, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, महिला आघाडी व युवासेना कार्यकर्ते रस्त्यावर उतरले. मा. धर्मवीर आनंद दिघे साहेब हे आमचे दैवत असून त्यांचा अपमान हा आम्हाला कधीही सहन होणार नाही, या ठाम भूमिकेतून हा प्रखर निषेध आंदोलन करण्यात आला. या आंदोलनातून कार्यकर्त्यांनी हे स्पष्ट केले की, दिघे साहेबांची उंची कोणी मोजूच शकत नाही, संजय राऊत यांच्या यांच्या सारख्या वक्तव्याचा शिवसैनिक तिव्र शब्दांत निषेध केला आणि करत रहनार.

❍ आमदार राजेश मोरे




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : आनंद दिघे नेते, उपनेते नव्हते, ते जिल्हाप्रमुख होते, बाळासाहेबांच्या बाजूला त्यांचा फोटो का? असा सवाल खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केल्यानंतर मोठा वाद पेटला आहे. अशातच आता शिवसेना शिंदे गटाचे कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांना थेट धमकी दिल्याचं पहायला मिळतंय. 'संजय राऊत यांना घरात घुसून मारू, अशी जाहीर धमकी शिंदे गटाचे आमदार मोरे यांनी दिली आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी धर्मवीर आनंद दिघे यांच्याविषयी केलेल्या वक्तव्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. शिवसेना शिंदे गटाच्या शिवसैनिकांनी संजय राऊत यांच्या विरोधात 'जोडे मारो' आंदोलनही केले. डोंबिवलीतील इंदिरा गांधी चौकात शिवसेना शिंदे गटाच्या वतीने आमदार मोरे यांच्या अध्यक्षतेखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ शिवसैनिक सदानंद थरवळ यांसह इतर शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आंदोलनादरम्यान शिवसैनिकांनी राऊत यांना थेट आव्हान दिले आहे. 'संजय राऊत यांनी चर्चेचा विषय घ्यावा, डिबेट ठेवावे, आम्ही शिवसैनिक येतो, असे खुले आव्हानही आंदोलकांनी दिले आहे.







## बदलापूर येथे जिल्हा परिषदेचे स्वस्थ नारी - सशक्त परिवार अभियान

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दि. १९ – "स्वस्थ नारी – सशक्त परिवार अभियान" या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, बदलापूर येथे विशेष तज्ञ शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आरोग्य सेवा उपक्रमाचा लाभ घेतला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नगरसेवक अनिलजी भगत यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुण्या म्हणून नीता खोतरे, अतिरिक्त गटविकास अधिकारी उपस्थित होत्या. प्राथमिक आरोग्य केंद्र बदलापूर वैद्यकीय अधिकारी डॉ प्रशांत कनोजा व डॉ अश्विनी वाणे, औषध निर्माण अधिकारी आर वाय पाटील , आरोग्य सहायक बोरकर, शिबिरासाठी विविध तज्ञ डॉक्टर आणि संस्थांनी मोलाची सेवा बजावली. यात दंत शल्यचिकित्सक डॉ. अर्चना पवार, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अरुणा बेल्लुरे, बालरोगतज्ज्ञ डॉ. हेमंत काटकर, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. रविंद्र चव्हाण, शमन कॅन्सर टीममधील डॉ. शीतल व सहकारी, एम.एम. युनिट आणि मॅमोग्राफी युनिटच्या डॉ. सदावर्ते व सहकारी, वत्सल्य आयसीएमआर मुंबईच्या डॉ. प्रेरना पाटील व सहकारी तसेच ईशा नेत्रालय व टीम यांचा समावेश होता. या शिबिरामध्ये एकूण १६८ रुग्णांनी (१३४ महिला व ३४ पुरुष) सहभाग घेतला. विविध तपासण्या करण्यात आल्या ज्यामध्ये स्त्रीरोग तपासणी ४५ महिला, नेत्र तपासणी २१ रुग्ण, दंत तपासणी २६ रुग्ण, बालरोग तपासणी २१ बालरुग्ण, मानसोपचार तपासणी १२ रुग्ण, पॅप स्मीअर तपासणी १३ महिला व साय-टीबी तपासणी १६ रुग्णांचा समावेश होता. महिलांच्या आरोग्य तपासण्या, कॅन्सर तपासणी, नेत्र तपासणी, दंत तपासणी व बालरोग तपासणीमुळे स्थानिक नागरिकांना महत्त्वपूर्ण सुविधा मिळाली.



## खासदार श्रीकांत शिंदे यांनी घेतली केडीएमसी आयुक्तांची भेट




### २७ गावांतील कर्मचाऱ्यांचा केडीएमसीत समाविष्ट करण्याबाबत घेतली बैठक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महापालिकेत आज २७ गावांतील कर्मचाऱ्यांचा महानगरपालिकेत समाविष्ट करण्याबाबत खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांच्या दालनात महत्वाची बैठक पार पडली. यावेळी बैठकीत विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी आमदार राजेश मोरे, जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, आगरी युथ फोरमचे अध्यक्ष गुलाब वझे, कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्यासह पालिका अधिकारी, स्थानिक पदाधिकारी कार्यकर्ते आणि अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात २७ गावातील ग्रामपंचायतीमधील ४९९ कर्मचाऱ्यांचा कल्याण डोंबिवली महापालिकेत समावेश करण्याचा निर्णय झाला होता. मात्र या कर्मचाऱ्यांची ज्या पदावर नियुक्ती झाली होती त्याच पदावर त्यांना महानगरपालिकेत रुजू करण्यात यावे अशी मागणी सातत्याने करण्यात येत होती. या मागणीबाबत शासनाकडे प्रस्ताव देखील पाठवण्यात आला होता. याला शासनाने मंजूरी दिली असून २७ गावातील सर्व कर्मचारी ज्या पदावर रुजू झाले होते त्याच पदावर त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार महापालिकेतही कार्यरत राहतील असा निर्णय शासनाकडून घेण्यात आला आहे. तर यातील १८० कर्मचाऱ्यांना नवरात्रीच्या दरम्यान याबाबतचे पत्र देखील देण्यात येईल,असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

याचबरोबर यातील निरक्षर कर्मचाऱ्यांना मेडिकल व पोलीस व्हेरिफिकेशन देण्यात यावे, गावातील मयत व निवृत्त कर्मचाऱ्यांच्या वारसांना नोकरी व पेन्शन लागू करण्यात यावे. ज्या कर्मचाऱ्यांचे शिक्षण कमी असल्यास, त्यांना निकष पूर्ण करणासाठी तीन वर्षांची मुदत दिली जावी. याबाबत चर्चा करण्यात आली. कचोरे टेकडी येथील संत सावळाराम महाराजांच्या स्मारक उभारणीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. स्मारक उभारणीसाठी निधीची उपलब्धता झाली असून लवकरच स्मारकाच्या उभारणीचे काम सुरू करण्याच्या सूचना यावेळी महापालिकेला दिल्या. २७ गावातील नागरिकांना भरावा लागणाऱ्या पाणी कराबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. याबाबत लवकरच आढावा बैठक आयोजित करून हा प्रश्न देखील मार्गी लावण्यात येईल असे सांगण्यात आले.

## प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत ठाणे जिल्हा परिषदेत डाटा एन्ट्री ऑपरेटरची भरती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत ठाणे जिल्हा परिषदेच्या अंतर्गत डाटा एन्ट्री ऑपरेटरच्या पाच रिक्त पदांची भरती करण्यात येत असून, पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दि. २४ सप्टेंबर, २०२५ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत असून, इच्छुक उमेदवारांनी आपला अर्ज जिल्हा परिषद ठाणे मुख्यालय येथे स्वतः सक्षम पद्धतीने किंवा टपालाद्वारे जमा करावा. अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती पडताळणीसाठी सादर करणे आवश्यक आहे.

या पदांसाठी निवड झालेल्या उमेदवारांना रु. २५,०००/- प्रतिमाह मानधन देण्यात येईल. शैक्षणिक अर्हता व इतर अटी जाहिरातीत स्पष्ट करण्यात आलेल्या आहेत.

भरतीसंदर्भातील जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हा परिषद ठाणेच्या अधिकृत संकेतस्थळावर https://zpthane.maharashtra.gov.in उपलब्ध करून देण्यात आले आहे.

इच्छुक उमेदवारांनी अंतिम मुदतीपूर्वी अर्ज दाखल करून या संधीचा लाभ घ्यावा, असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी आवाहन केले आहे.

## डॉ. विजय जाधव यांच्या हस्ते स्टेलर डोम तारांगणाचे उद्घाटन

### स्टेलर डोम वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणारा उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शिक्षणमहर्षी पद्मश्री अण्णासाहेब जाधव यांच्या जयंतीनिमित्त कल्याण येथील सिटी पार्कमध्ये विज्ञानविषयक उपक्रमांतर्गत स्टेलर डोम तारांगणाचे उद्घाटन पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय जाधव यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.या सोहळ्याचे प्रमुख शिल्पकार बी.एन.एन. महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागाचे प्रा.डॉ. रवी मनोहर व डॉ. दिलीप काकवीपुरे होते. ज्यांनी हे अद्भुत तारांगण तयार केले. त्यांच्या या कार्याला संस्थेचे अध्यक्ष व कार्याध्यक्ष यांनी नेहमी प्रोत्साहन दिले.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ समाजसेवक खर्डीकर, प्राचार्य महादेव कांबळे, प्रा. शामराव सावंत, सिटी पार्कचे मॅनेजमेंट ग्रुप व अन्य तज्ञ मान्यवर उपस्थित होते. डॉ. रवी मनोहर हे विविध वैज्ञानिक संशोधनांसाठी प्रसिद्ध असून, त्यांच्या कार्यात "कल्पनेपलीकडील विश्व" समजून घेण्याचा सातत्याने प्रयत्न



असतो. स्टेलर डोम हे त्यांचे असेच एक प्रयोगशील यशस्वी पाऊल असून, या प्रकल्पाला जपानचे लेन्स तज्ञ युसुके शिरतो यांनी भेट देऊन विशेष प्रशंसा केली आहे.

डॉ. काकवीपुरे व डॉ. मनोहर हे दोघेही विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी अहोरात्र कार्यरत आहेत. आजपर्यंत त्यांच्या नावावर ६ पेटंट्स व अनेक संशोधन पेपर्स आहेत. समाजहितासाठी त्यांचे निस्वार्थ योगदान हा प्रेरणादायी आदर्श ठरतो आहे.

## सेवानिवृत्त शिक्षक संघटनेने घेतली शिक्षण अधिकाऱ्यांची भेट



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : अखिल सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघ रायगडचे पदाधिकारी यांनी रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षणाधिकारी श्रीमती दहितुले मॅडम यांची भेट घेऊन संघटनेच्या माध्यमातून विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

त्यावेळी गटविमा, फंड, 3% महागाई, 2% महागाई, 7 व्या वेतन आयोगाचे हप्ते न मिळालेल्या रकमेची मागणी, 1 जुलै वेतनवाढीबाबत माहिती, दुय्यम सेवा पुस्तकांची लवकरात लवकर मागणी, उपादान व अंशराशिकरण रकमा मार्च 2025 पर्यंत मागणी केली आहे. महागाई फरक न मिळालेल्या शिक्षकांच्या रकमा गटाकडे पाठवल्या आहेत. ज्या गटांनी मागणी केली नाही असे तालुके वंचीत राहतील. निवडश्रेणी प्रत्येक तालुक्यात सेवापुस्तक तपासणीसाठीअधिकाऱ्यांची नियुक्ती करून श्री.कदम साहेब लेखाधिकारी रायगड यांनी ज्या पुस्तकावर चुकून सह्या राहिल्यात त्यांच्या सोमवार पर्यंत सह्या होतील असे सांगितले आहे.

यावेळी सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष अमरचंद पाटील जिल्हा सरचिटणीस गुरूनाथ पाटील कोषाध्यक्ष जगन्नाथ मोकल पेण तालुका अध्यक्ष राजाराम गावंड पनवेल तालुका अध्यक्ष नरेश पाटील मुरलीधर म्हात्रे पेण तालुका सरचिटणीस, सल्लागार पांडुरंग म्हात्रे पेण कोषाध्यक्ष प्रदीप म्हात्रे सदस्य रविंद्र पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## टिटवाळ्यात ६६ वीजचोरांचा पर्दाफाश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : टिटवाळा परिसरात महावितरणने राबवलेल्या विशेष मोहिमेत तब्बल ६६ वीजचोरांचा पर्दाफाश झाला आहे. इंदिरा नगर, गणेशवाडी आणि बल्लाणीसह टिटवाळ्याच्या विविध भागांमध्ये ही कारवाई करण्यात आली. या वीजचोरांनी बेकायदेशीररीत्या १ लाख २१ हजार युनिट वीज वापरून तब्बल ३० लाख ७३ हजार रुपयांचे नुकसान केले होते.वीज ही आजच्या काळातली जीवनरेखा असून तिच्या चोरीमुळे प्रामाणिक ग्राहकांवर आर्थिक ताण येतो. विजेची थेट जोडणी घेणे, मीटर असूनही त्याला बायपास करणे किंवा सर्व्हिस वायरमध्ये छेडछाड करून वीज वापरणे असे प्रकार या तपासणीत उघड झाले. त्यामुळे महावितरणने कठोर पाऊले उचलत सर्व वीजचोरांविरोधात वीज कायद्यानुसार गुन्हे दाखल केले आहेत. कायद्यानुसार वीज चोरी हा गंभीर गुन्हा मानला जातो आणि दोष सिद्ध झाल्यास कारावासासह मोठा दंडही ठोठावला जाऊ शकतो.ही कारवाई महावितरण

### महावितरणची धडाकेबाज कारवाई

कल्याण परिमंडळाचे मुख्य अभियंता चंद्रमणी मिश्रा, अधीक्षक अभियंता व्ही. एस. फुंदे, कार्यकारी अभियंता विनय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. टिटवाळा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता गणेश पवार यांनी जुलै ते ऑगस्टदरम्यान विशेष मोहीम राबवून तपासणी केली. त्यांच्या सोबत सहाय्यक अभियंता निलेश शिर्के, शाखा अभियंता तुकाराम घोडविंदे, धनंजय पाटील, सचिन पवार आणि योगेश चेंदवणकर यांनी मेहनत घेऊन संपूर्ण कारवाई यशस्वीरीत्या पूर्ण केली.या कारवाईमुळे वीजचोरांचे जाळे उघडकीस येऊन प्रामाणिक ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. विजेच्या चोरीविरोधातील अशा मोहिमांमुळे भविष्यात कोणीही बेकायदेशीर मार्गाने वीज वापरण्याचे धाडस करणार नाही, असा विश्वास महावितरण अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

## विद्यार्थी समूहाच्या माध्यमातून होणार सर्वांगीण विकास

### गटांमधून ज्ञान, कौशल्य आणि मूल्यांची जोपासना

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : शाळेत समान आवड, छंद किंवा विषय आवड असलेल्या मुलांना एकत्र करून 'विद्यार्थी समूह' तयार केला जाणार आहे. या समूहात ते एकमेकांना मार्गदर्शन करतील, शिकतील आणि शिकवतील. आपली कौशल्ये विकसित करावीत व सर्जनशीलता फुलवावी म्हणून राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० अंतर्गत राज्यातील पहिली ते बारावीपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी ३४ 'विद्यार्थी समूह' स्थापन करण्याचा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढेल, प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्याची संधी मिळणार आहे. राज्यातील सर्व शाळांना विद्यार्थी समूह सुरू करणे अनिवार्य राहणार आहे. त्यामुळे हा उपक्रम राज्यभर राबवला जाईल. विद्यार्थी समूहामुळे विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी शिक्षण नव्हे तर जीवनमूल्ये शिकण्याची संधी मिळणार आसून त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वांगीणपणे घडेल.

स्थानिक विद्यालयात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी विद्यार्थी समूह कला, क्रीडा, विज्ञान, तंत्रज्ञान, गणित, वाचन, पर्यावरण, संगीत, नाट्य, वाद्यवृंद तसेच स्काऊट-गाईड अशा ३४ विविध विषयांवर आधारित विद्यार्थी गटांच्या माध्यमातून शालेय जीवन अधिक समृद्ध व अर्थपूर्ण होणार आहे. विद्यार्थ्यांच्या नवीन आवडी ओळखून नवीन गट तयार करण्याची मुभा शाळांना दिली जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या लपलेल्या गुणांना वाव मिळण्यासाठी ही संकल्पना फारच उपयुक्त ठरेल. त्यांच्यातील संवादकौशल्य, सामाजिक भान आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

गटचर्चा, प्रकल्प कार्य, वादविवाद स्पर्धा आणि विज्ञान प्रदर्शन यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये जिज्ञासा, विचारशक्ती व संशोधनाची वृत्ती विकसित होत आहे. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढून आत्मविश्वास वृद्धिंगत होणार आहे. क्रीडा महोत्सव, व्यायाम, योग व सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत नाट्य, संगीत, चित्रकला यांसारख्या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक तसेच सांस्कृतिक विकास साधला जात आहे. यातून विद्यार्थ्यांच्या अंगभूत सृजनशीलतेला योग्य दिशा मिळणार आहे. विद्यार्थी समूहांतर्गत विविध जबाबदाऱ्या पार पाडताना विद्यार्थ्यांचे नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, संघभावना आणि सामाजिक जाण वाढत आहे. सहकार्य, शिस्तबद्धता आणि लोकशाही मूल्यांची प्रत्यक्ष शिकवण या गटांमधून मिळणार आहे.

> **राज्यभर राबविले जाणारा विद्यार्थी समूह कला, क्रीडा, विज्ञान, तंत्रज्ञान, गणित, वाचन, पर्यावरण, संगीत, नाट्य, वाद्यवृंद अशा ३४ विविध विषयांवर आधारित असतील. विद्यार्थ्यांच्या नवीन आवडी ओळखून नवीन गट तयार करण्याची मुभा शाळांना दिली जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या लपलेल्या गुणांना वाव मिळण्यासाठी ही संकल्पना फारच उपयुक्त ठरेल. त्यांच्यातील संवादकौशल्य, सामाजिक भान आणि आत्मविश्वास वाढविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.**
>
> **– मनोज महाजन,व्यवसाय मार्गदर्शक व शालेय समुपदेशक**

"या उपक्रमांतूनच भविष्यात जबाबदार, सक्षम आणि समाजाभिमुख नागरिक तयार होणार आहे," असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या माध्यमातून विद्यार्थ्यार्थ्यांची नेतृत्वगुण, कल्पनाशक्ती, संघभावना आणि समस्या सोडवण्याची क्षमता विकसित होईल. वर्गखोल्याबाहेरही मुलांची कल्पकता खुलून येईल.असे व्यवसाय मार्गदर्शक व शालेय समुपदेशक मनोज महाजन यांनी सांगितले आहे.

## पावसाळी क्रीडा स्पर्धांमध्ये न्यू इंग्लिश मोरा शाळेचे घवघवीत यश

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : तालुकास्तरीय पावसाळी शालेय क्रीडा स्पर्धा सुरू झाल्या असून त्यामध्ये जे .एम .म्हात्रे न्यू इंग्लिश स्कूल मोरा शाळेतील विद्यार्थ्यांनी भाग घेऊन घवघवीत यश संपादन केलं आहे. क्रीडा शिक्षक अनिल कमलाकर पाटील व मार्गदर्शक साईनाथ रामदास गावंड, (प्रभारी मुख्याध्यापक) सुधीर शांताराम मुंबईकर, ( मुख्याध्यापक)वरिष्ठ शिक्षक मनोज वसंत म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली. शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी वयोगटानुसार क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेऊन यश संपादन केले आहे.

उरण तालुकास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धा 2025 अंतर्गत मुलींच्या स्पर्धांमध्ये कुमारी प्रणाली प्रकाश कातकरी (17 वर्षे वयोगट) 400 मीटर धावणे. प्रथम



क्रमांक कुमारी अश्विनी आत्माराम कातकरी (19 वर्षे वयोगट)1500 मीटर धावणे. प्रथम क्रमांक 4x400 मी. रिले प्रथम क्रमांक(17वर्षे वयोगट)4x100 मी. रिले तृतीय क्रमांक (17 वर्षे वयोगट) कुमारी ममता राजकुमार चौगुले 1500 मीटर धावणे. द्वितीय क्रमांक (17 वर्ष वयोगट) कुमारी अश्विनी आत्माराम कातकरी 3000 मीटर धावणे. तृतीय क्रमांक (17 वर्षे वयोगट) कुमारी अंकिता अनुप गौंड 400 मीटर धावणे. तृतीय क्रमांक (17 वर्षे वयोगट)कुमारी कोमल नडगिरी 600 मीटर धावणे तृतीय क्रमांक.( 14 वर्षेवयोगट) प्रथम व द्वितीय क्रमांक विजेत्या स्पर्धकांची रायगड जिल्हा स्तरावर निवड झाली आहे. तसेच तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा २०२५-२६ मध्ये तालुकास्तरावर खो-खो स्पर्धांमध्ये 17 वर्षाखालील मुलींनी प्रथम क्रमांक मिळविला सर्व खेळाडूं व संघांची जिल्हास्तरावर निवड झाल्याबद्दल शाळा कमिटी, संस्थाप्रमुख, अध्यक्ष यांच्यावतीने सर्वांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

## रक्तदान शिबीर व ग्रंथ दान करून सभापती रवींद्र घोडविंदे यांचा वाढदिवस साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा** : जीवनदिप महाविद्यालय अध्यक्ष व कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रवींद्र घोडविंदे यांचा वाढदिवस निमित्ताने रक्तदान शिबीराचे आयोजन तसेच ग्रंथदान करण्यात आले होते,

जीवनदिप महाविद्यालय शिक्षक व कमैचारी कडून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बावीस पुस्तकांचा ख़ड देण्यात आले, तसेच रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते, शिक्षक, कमैचारी, विध्यार्थी व कार्यकर्ते यांनी मोठ्या प्रमाणात रक्तदान केले,

सभापती रवींद्र घोडविंदे यांना शुभेच्छा देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नरेश सुरोशी, योगेश धुमाळ, रविंद्र भोईर, भाऊसाहेब नरवडे, किशोर



वाडेकर, जिल्हा परिषद माजी सदस्य जयश्री सासे, ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक उपाध्यक्ष अरुण पाटील, भाजप कल्याण तालुका मंडळ अध्यक्ष शेखर लोणे, जिल्हा उपाध्यक्ष राजाराम चौधरी, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष बाळाराम कोर, देवीदास चौधरी,संजय शेलार, अनंता दोरलीकर, भगवान सुरोशी, रविंद्र जाधव, चिंतामण मगर,कोंडु भोईर, रसिका मगर, सुयोग मगर, सदानंद मोरे,सागर मोरे,देवा सोनावले, रोहन कोट, प्रविण ढोले, सुभाष पंडित,अशिफ पावले, गणेश भोईर,राजेंद्र जाधव, वैभव पाटोळे, वैभव सोनावणे, सुभाष चौधरी,यांच्या सह पंचक्रोशीतील नागरिक व विविध पक्षांचे कायैकतै मोठ्या संख्येने उपस्थित होते,


जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in







## आजचे राशि भविष्य

**मेष**
राजकीय कार्ये पूर्ण होतील.कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. आरोग्य उत्तम राहील. मनोरंजनावर खर्च होईल.

**वृषभ**
शत्रू पराभूत होतील. व्यापार-व्यवसायात सुखद स्थितीचे वातावरण राहील. वैवाहिक सुख वाढेल. नोकरपेशा व्यक्तींसाठी काळ चांगला आहे.

**मिथुन**
न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल. आरोग्य उत्तम राहील. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहील.

**कर्क**
संपत्तीच्या खरेदी-विक्रीसाठीही उत्तम दिवस. घरासाठी मोठी खरेदी करू शकता. कार्य योग्य वेळी पूर्ण करण्यासाठी कठोर श्रम करावे लागेल.

**सिंह**
महत्वाच्या कामांमध्ये सुरळीतरीत्या सहयोग मिळेल. कौटुंबिक वातावरण आनंदाचे राहील. मान-सन्मानात इच्छानुरूप वाढ होईल.

**कन्या**
कौटुंबिक विषयांमध्ये वेळ चांगला जाईल. व्यापार-व्यवसायात स्थिती अनुकूल राहील. मित्रांचा आधार घेऊन कार्य करा.

**तूळ**
मान-सन्मानात वाढ होईल.दिवस जोमदार ठरेल. आपला विधायक दृष्टीकोण इतरांबरोबर समन्वय साधण्यात मदत करतो. क्रोधावर संयम ठेवा.

**वृश्चिक**
जोडीदाराशी वादविवाद टाळा. यथायोग्य विचार करून कार्य करा अडचणी येण्याची शक्यता आहे. शत्रू वर्गापासून दूर राहा.

**धनु**
दिवस आनंदात व्यतीत होईल. राजकीय कार्ये होतील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. पत्नीपासून लाभ मिळेल.

**मकर**
काहीकाळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल. कौटुंबिक विषयांमध्ये वेळ अनुकूल राहील. वैवाहिक जीवनात वातावरण मधुर राहील.

**कुंभ**
आर्थिक नुकसानीची शक्यता आहे. आपली बेपर्वाई आपणासमोर अनपेक्षित प्रश्न उभे करेल. धार्मिक भावना वाढेल.

**मीन**
जोडीदाराशी वादविवाद टाळा. यथायोग्य विचार करून कार्य करा अडचणी येण्याची शक्यता आहे. शत्रू वर्गापासून दूर राहा.


नियमित वाचा
दैं. ठाणे जीवनदीप वार्ता

# लोकनेते आदरणीय आमदार किसन कथोरे ■ चार दशकांची अखंड समाजसेवा

सध्याच्या बदलत्या राजकीय प्रवाहात आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडत आदर्श विचारधारा जोपासणारे, केवळ निवडणुकी पुरते राजकारण एरवी समाजकारणाचे व्रत जोपासणारे ठाणे जिल्ह्यातील संवेदनशील लोकप्रतिनिधी म्हणजे आमदार किसन कथोरे .चार दशकांहून अधिक काळ ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात लोकप्रतिनिधी म्हणून अखंड कार्यरत असलेले किसन कथोरे सर्वसामान्यांचे कैवारी, विकासपुरुष या बिरूदावलीना साजेसे काम करीत आहेत. सामाजिक बांधिलकी हाच राजकारणाचा केंद्र बिंदू मानून अखंड जनसेवेचा वसा घेतलेले मुरबाड विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय भाजप आमदार आदरणीय किसन कथोरे यांचे कार्य अफाट आणि अतुलनीय आहे.

गेली चार दशके राजकारणाच्या माध्यमातून समाजस्नेही उपक्रम राबवून गोरगरीब जनतेला त्याचे लाभ मिळवून देत आहेत. बहुतांश ग्रामीण भाग असणाऱ्या मतदार संघातील महिलांची हिमोग्लोबिन तपासणी, विधवा महिलांच्या मुलींच्या लग्नात आमदारांच्या हस्ते कन्यादान, मुलींच्या जन्माचे स्वागत, शासकीय योजनांची जत्रा, गोवेली येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून कँन्सर रुग्णालय, ग्रामीण भागातील अन्य शासकीय रुग्णालयांचे सक्षमीकरण, नेत्र चिकित्सा शिबिरे आदी विविध उपक्रमांमधून समाजातील सर्व लहानथोरांना लाभ मिळवून देण्याचे अखंड कार्य आमदार कथोरे साहेबांच्या प्रयत्नामधून सुरू असते. त्यामुळे हे संवेदनशील नेतृत्व कायम जनतेच्या गराड्यात दिसते. दररोज शेकडो माणसे त्यांना भेटून त्यांच्या अडचणी,समस्या मांडत असतात आणि कथोरे साहेब प्रत्येकाचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात. साहेबांवर लोकाचं किती प्रेम आहे, याची प्रचिती त्यांच्या वाढदिवशी लोटणाऱ्या अफाट लोकसागराला पाहून येते. १९ सप्टेंबर हा त्यांचा वाढदिवस. जवळपास आठवडाभर त्यानिमित्त मतदार संघात आमदार साहेबांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम सुरू असतात. यंदाही कथोरे साहेबांचे समर्थक वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबविणार आहेत. यानिमित्त गेल्या चार दशकातील कथोरे साहेबांची अखंड समाजसेवा, त्यामागची प्रेरणा, विचार आणि भूमिका याविषयी त्यांच्याशी साधलेला सविस्तर संवाद....

*** आमदार म्हणून प्रदिर्घ काळ कार्यरत असताना सदैव सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न आपण करीत आहात. त्यामागची प्रेरणा काय ?**

- एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात माझा जन्म झाला. आमचे कुटुंब बारवी धरण प्रकल्पग्रस्त. त्यामुळे ग्रामीण भागातील रहिवाशांच्या अडचणी,त्यांच्या समस्या, त्यांचे प्रश्न मी अगदी जवळून पाहिले आहेत. तेव्हा लोकप्रतिनिधी म्हणून राजकीय क्षेत्रात प्रवेश केल्यानंतर मी त्यांच्या अडचणी सोडविण्याचे प्रयत्न सुरू केले. सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविणे हेच माझ्या कार्याचे मुख्य उद्दिष्ट ठरले.

**• गेल्या चाळीस वर्षात आपण त्यात कितपत यशस्वी झालात असे आपणांस वाटते ?**

- गेल्या चाळीस वर्षात ग्रामीण भागात अनेक सुविधा झाल्या. गावपाड्यांपर्यंतचे रस्ते काँक्रिटचे झाले. पाणी पुरवठ्याच्या योजना राबवल्या. ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांचे सक्षमीकरण केले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा, तरुणांना रोजगाराच्या संधी मिळाव्यात याद्दष्टीने प्रयत्न सुरू आहेत. आमदार म्हणून मुरबाडचे लोकप्रतिनिधीत्व स्वीकारले, तेव्हा राज्यातील मागास तालुका अशी या परिसराची ओळख होती. विविध योजना आणि उपक्रम राबवून मुरबाड तालुक्याला प्रगतीपथावर नेण्याचे काम केले. त्यात सर्वांच्या सहकार्याने निश्चितच यशस्वी झालो, असे म्हणता येईल.

**• एकल महिलांच्या (विधवा) मुलींच्या लग्नात कन्यादान हा उपक्रम आपण यशस्वीपणे राबवीत आहात, ही योजना राबवताना नेमक्या मनात काय भावना होत्या ?**



- पतीच्या दुर्दैवी मृत्यूनंतर मोठ्या हिंमतीने महिला एकटीने संसाराचा गाडा हाकतात. मुला-मुलींचे शिक्षण करतात. या कर्तबगार महिलांसाठी काहीतरी करावं, असं मनात होतं. त्यातून विधवा मुलींच्या लग्नात मतदार संघाचा आमदार म्हणून आपण कन्यादान करावं,हा विचार पुढे आला. माझ्या कुटुंबियांनी, कार्यकर्त्यांनी ही कल्पना उचलून धरली. त्यामुळे गेल्या अकरा वर्षात सुमारे ४ हजारांहून अधिक लग्नात उपस्थित राहून आमदार कन्यादान योजना राबवता आली. कन्यादान योजनेत सर्व जातीय आणि धर्मीयांचा समावेश असतो. या योजनेच्या माध्यमातून प्रेम आणि आपुलकीने हजारो कन्या आणि त्यांच्या कुटुंबियांशी स्नेहाचे नाते निर्माण करू शकतो, याचा मला अभिमान आणि समाधान आहे.

*** अशाच प्रकारे मुलींच्या जन्माचे स्वागत करणारी योजना आपण मतदार संघात सुरू केली आहे. त्याबद्दल काय सांगाल ?**

- आधुनिक युगात अजूनही समाजाचा एका मोठा घटक स्त्रीजन्माविषयी उदासीनता बाळगून आहे. त्यामुळे मुलींचा जन्मदर मुलांच्या तुलनेत कमी आहे. मुला-मुलींच्या संगोपनातही काही पालक भेदभाव करतात. याविषयी जनजागृती व्हावी, या उद्देशाने आम्ही बदलापूरमध्ये मुलींच्या जन्माचे स्वागत करणारी योजना सुरू केली. बदलापूरचे माजी नगरसेवक आणि भाजप नेते किरण भोईर यांनी त्यासाठी पुढाकार घेतला. या योजनेत ज्या कुटुंबात मुलीचा जन्म होतो, त्यांना ब्रॅन्डेड कंपनीचे बेबी ऑईल, साबण, पावडर आदी १४ वस्तूंचा संच, सुकन्या योजनेचा पहिला हप्ता भरून देतो. आतापर्यंत सुमारे १३०० मुलींना या योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

*** मतदार संघातील नेत्र चिकित्सा उपक्रमाची बरीच प्रशंसा होते, त्याविषयी काय सांगाल ?**

- नेत्र चिकित्सा मोहिमेत गेली ३४ वर्ष कार्यरत असणारा बदलापुरातील आमचा कार्यकर्ता साकीब गोरे आणि सहकाऱ्यांनी त्यांच्या व्हिजन फ्रेंड साकिब गोरे या संस्थेच्या माध्यमातून अवघ्या ३३ रुपयांमध्ये चष्मा उपलब्ध करून दिला आहे. महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन त्यांच्या नावाने हा 'देवाभाऊ' चष्मा आता अफ्रिका आणि आशिया खंडातील अनेक देशांमध्ये लोकप्रिय ठरला आहे. साकिब गोरे आणि सहकाऱ्यांनी गेल्या ३० वर्षात १७०० गावांमधून २६ लाख लोकांची मोफत नेत्र तपासणी केली आहे. तसेच १७ लाख चष्म्यांचे वाटप केले आहे.

**• आपण राबवलेल्या अनेक योजनांची नंतर राज्याने दखल घेतल्याचे दिसते. उदा. शासकीय योजनांची जत्रा. त्याबद्दल काय सांगाल ?**

माझ्या मतदार संघात बहुसंख्येने ग्रामीण भागातील जनता आहे. त्यातही आदिवासी समाज मोठ्या प्रमाणात आहे. कोणत्याही कामासाठी शासकीय कार्यालयात जाण्याविषयी हा समाज उदासीन असतो. त्यामुळे त्यांच्यासाठी असलेल्या अनेक योजना वापराविना पडून राहत होत्या. त्यामुळे मुरबाडमध्ये शासकीय योजनांची जत्रा भरवली. तत्कालिन आणि विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब या जत्रेला आले होते. हजारो लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ झाला. महायुती शासनाने राबवलेली आणि लोकप्रिय ठरलेली 'शासन आपल्या दारी' योजनेचाही हाच हेतू होता. महिलांच्या हिमोग्लोबीन तपासणी मोहिमेचीही बरीच चर्चा झाली. सुदृढ आरोग्यासाठी रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण १२ टक्के असायला हवे, मात्र स्वत:च्या आहाराकडे दुर्लक्ष करीत असल्याने ग्रामीण भागातील अनेक महिलांचे हिमोग्लोबीनचे प्रमाण अवघे ४ ते ५ टक्के इतके असते. त्याचा त्यांना प्रसूतीकाळात त्रास होतो. प्रसंगी जीवासही धोका होऊ शकतो. त्यामुळे ग्रामीण भागात ही योजना प्राधान्याने राबवली. त्यातून मोठी जनजागृती झाली.

**• हिमोग्लोबीन तपासणीप्रमाणेच कॅन्सर निवारण योजना आपण मतदार संघात लवकरच राबविणार असल्याचे कळले. काय आहे ती योजना ?**

- ग्रामीण भागातही कॅन्सर रोगाचा प्रादुर्भाव वाढीस लागला आहे. महिला त्यांच्या आरोग्याविषयी उदासीन असतात. त्यामुळे टाटा रुग्णालय, रोटरी क्लब आणि जिल्हा आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण मतदार संघात गावोगावी कॅन्सर तपासणी मोहीम लवकरच हाती घेतली जाणार आहे. केवळ तपासणीपुरता ही मोहीम मर्यादित नाही, तर आढळणाऱ्या रुग्णांवर उपचारही केले जाणार आहेत. तपासणी आणि उपचार दोन्ही विनामूल्य असणार आहे. एकुणच मतदार संघातील नागरिकांना अधिक चांगल्या दर्जाच्या आरोग्य सुविधा मिळाव्यात म्हणून मी आग्रही आहे. कल्याण तालुक्यातील गोवेली येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून कॅन्सर रुग्णालय सुरू झाले आहे. ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रे आणि रुग्णालयांचे सक्षमीकरण केले जात आहे. तिथे आरोग्याच्या अधिकाधिक सुविधा पुरवल्या जात आहेत. बदलापूर येथील उपजिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यामुळे या रुग्णालयास आता सामान्य रुग्णालयाचा दर्जा मिळाला आहे. इथे ५० खाटांऐवजी २०० खाटांचे सुसज्ज रुग्णालय उभारले जाईल. बदलापूर आणि ग्रामीण भागातील गोरगरीब रुग्णांना त्याचा लाभ मिळेल.

**• माळशेज घाट परिसरात आपल्या प्रयत्नांनी अनेक नाविन्यपूर्ण योजना राबविण्यात येत आहेत. त्याविषयी काय सांगाल ?**

- अर्थसंकल्पीय अधिवेशनात माळशेज घाटातील काचेच्या स्कायवॉक योजनेला मंजुरी मिळाली आहे. लवकरच हा प्रकल्प मार्गी लागेल. थितबी पर्यटन ग्रामयोजना कार्यान्वीत झाली आहे. या प्रकल्पांमुळे या भागात पर्यटकांचा ओघ वाढेल. त्यातून स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. या व्यतिरिक्त सावर्णे येथे दिंडीभवन उभारतोय. माळशेज मार्गे शिर्डी, शनि शिंगणापूर, भीमाशंकर आदी तीर्थक्षेत्री अनेक भाविक दिंडया घेऊन पायी जातात. माळशेज घाट परिसरात त्यांच्या विश्रामाची सोय व्हावी या हेतूने सावर्णे येथे दिंडीभवन उभारीत आहोत. या ठिकाणी तीन हजार भाविकांची निवासाची विनामूल्य सोय केली जाणार आहे. तसेच त्यांना महाप्रसादही दिला जाईल. या दिंडीभवन परिसरात विठ्ठल रखुमाईच्या भव्य मूर्ती बसविण्यात येणार आहेत. उल्हास नदी किनारी छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा बसविण्यात आला आहे. त्याच्यामागे तीन एकर जागेत भव्य शिवसृष्टी उभारत आहोत. तसेच उल्हास नदीच्या किनारी १११ फुटी श्रीशंकराचा पुतळा उभारणार आहोत. त्याचप्रमाणे बदलापूरच्या सोनिवली येथील स्मारक परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुतळाही बसविला जाणार आहे. बदलापूरमध्ये गेली अनेक वर्षे जानेवारी महिन्यात राष्ट्रीय कीर्तन महोत्सव आयोजित केला जातो. - परिसरातील हजारो भाविक त्याचा लाभ घेतात.

# शिवकालीन रणरागिणींच्या स्मृती जागवणारा प्रेरणादायी सोहळा

## रवींद्र मालुसरे राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील रणरागिणींचा पराक्रम आणि स्त्रीशक्तीची परंपरा नव्या पिढीपुढे उभी करण्यासाठी श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनल आणि मराठी साहित्य व कला सेवा यांच्या संयुक्त विद्यमाने दादरच्या श्री शिवाजी मंदिर नाट्यमंदिरात वार्षिक सोहळा शेकडो विद्यार्थी, पालक आणि शिवप्रेमींच्या उपस्थितीने उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थित प्रेक्षकांना आनंद दिला.

सुप्रसिद्ध इतिहास अभ्यासक-लेखक प्रवीण भोसले यांनी प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले, "शिक्षणाचा उपयोग केवळ प्रमाणपत्रापुरता न राहता दैनंदिन आयुष्यात आणि आवडीच्या क्षेत्रात कर्तबगारी दाखवण्यासाठी करावा. वैयक्तिक आयुष्यात शिक्षणाची पात्रता सिद्ध करायला लागते. आज तुमचा शिक्षणाचा टप्पा पूर्ण झाला आहे, घेतलेल्या शिक्षणाचा रोजच्या व्यवहारात वापर कसा करणार आहात, हे जसे खरे आहे तसेच तुम्हाला इतर ज्या क्षेत्रात आवड आहे त्यात तुमचे अंगीकृत गुण दाखवत यशस्वी जीवनाला सामोरे जावे लागणार आहे. शिवरायांचे आठवावे रूप, आठवावा प्रताप — असे म्हणताना इतिहासाच्या पानांवर कोरलेल्या रणरागिणी डोळ्यासमोर येतात. मातोश्री जिजाबाई, महाराणी येसूबाई, ताराराणी, यलम्मा, पुण्यश्लोक अहिल्याबाई, विरांगणा रायबागन या स्त्रिया भावनांवर विजय मिळवत प्रत्येक आव्हानाला सामोरे जात होत्या. त्या स्वराज्यसेवक वीरांचा आधार होत्या आणि अप्रत्यक्षपणे स्वराज्यासाठी लढत होत्या. आजही स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात पुढे आहेत. तुम्हीही त्यांचा आदर्श घ्यावा."

विशेष पाहुणे म्हणून उपस्थित एनएसजी कमांडो नरेश पवार यांनी आपल्या लष्करी अनुभवांची माहिती दिली. ते म्हणाले, "पठाणकोट हल्ला, जम्मू-काश्मीरमधील कारवाया, पुंछ येथे बॉर्डरपार ऑपरेशन — सलग तीन वर्षे पाकिस्तानविरोधात कार्य करताना आम्ही अनेक संकटांना सामोरे गेलो. नुकतेच यशस्वी झालेले सिंदूर ऑपरेशन जाहीर करणाऱ्या कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग या दोन धाडसी महिला होत्या. घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग सैन्यदलासाठीही करता येतो, प्राधान्याने देशसेवा करता येईल त्या द्दष्टीने प्रयत्न करावेत."

छत्रपती शिवाजी महाराजांचे सिद्धांत समाजकार्याचा पाया ठरावेत, या ध्येयाने कार्य करणाऱ्यांना दिला जाणारा सुभेदार वीर तानाजी मालुसरे सन्मान पुरस्कार २०२५ मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष आणि इतिहास अभ्यासक रवींद्र मालुसरे यांना प्रदान करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते म्हणाले, "स्वराज्य हे शहाजी राजे आणि राजमाता जिजाऊ माँसाहेब यांचे स्वप्न होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी ते सत्यात उतरवले, संभाजी महाराजांनी त्याचा विस्तार केला. या यज्ञात असंख्य मावळ्यांनी प्राणांची आहुती दिली. त्यांच्या बलिदानामुळे महाराष्ट्र धर्म काय असतो हे जगाला कळाले. या इतिहासाचा विसर मराठी माणसाला पडता कामा नये. मालुसरे कुळात जन्म झाल्याने सुभेदारांचा इतिहास पुढे आणणे हे मी कर्तव्य समजतो आहे.

संस्थेचे प्रमुख डॉ. हेमंतराजे गायकवाड यांनी संस्थेचे योगदान अधोरेखित केले. ते म्हणाले, "बारावीनंतर मुलींनी स्वावलंबी व्हावे, ही संकल्पना घेऊन मी डॉ. गायकवाड इन्स्टिट्यूट सुरू केले. आज ते पॅरामेडिकल क्षेत्रात देशभरात महत्त्वाचे स्थान मिळवून आहे. होमगार्ड प्रमुख म्हणूनही काम केल्यामुळे त्या कठोर शिस्तीमुळे अनेक मुली माझ्यावर बापासारखा विश्वास ठेवतात." तसेच, छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनकार्य देशातील विविध भाषांमध्ये पोहोचवण्यासाठी त्यांनी श्री शिवाजी ज्ञानपीठ इंटरनॅशनलची स्थापना केली असल्याचेही त्यांनी सांगितले. छत्रपती शिवाजी महाराज ते छत्रपती राजाराम महाराज या काळातील इतिहास मी ग्रंथरूपाने इंग्रजी-मराठीसह इतर भाषामध्ये प्रकाशित केला आहे.

सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित राज्यस्तरीय शिवकालीन रणरागिणी निबंध स्पर्धेतील विजेत्यांना गौरविण्यात आले. डॉ. अनुज अविनाश केसरकर, मुंबई (प्रथम क्रमांक), प्रा. प्रशांत पुंडलिक शिरुडे, ठाणे (द्वितीय क्रमांक), सुमिता अभिषेक पवार, मुंबई (तृतीय क्रमांक ), स्नेहल गोविंद चव्हाण, रत्नागिरी आणि हिमांशू विजय शुक्ल, जळगाव (उत्तेजनार्थ ) यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले.कार्यक्रमाला मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे माजी अध्यक्ष विजय ना कदम, ज्येष्ठ पत्रकार राजन देसाई, ज्येष्ठ वृत्तपत्र लेखक दिलीप दळवी, रामचंद्र जयस्वाल, राजेंद्र मालुसरे, जयवंत मालुसरे, संजय धामापूरकर, अजय नागवेकर उपस्थित होते.

सोहळ्याचे सूत्रसंचालन मराठी साहित्य व कला सेवाचे संस्थापक अध्यक्ष गुरुदत्त वाकदेकर, युक्ता गोठणकर आणि आरती लोखंडे यांनी केले. आर्णा सुर्वे, साक्षी निर्मल, गौरव गायकवाड, समिक्षा बिळीगुदरी आणि साहिल धाकतोडे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# जीवनदीप मध्ये आर्थिक साक्षरता विषयावर वेबिनार संपन्न





**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमी तत्परतेने कार्य करणारे जीवनदीप महाविद्यालय. सदर महाविद्यालयात दिनांक १९- ०९-२०२५ रोजी बीए अर्थशास्त्र, वाणिज्य विभाग, BAF विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना प्रोजेक्टरच्या माध्यमातून आर्थिक साक्षरता या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी तसेच स्मार्ट इन्व्हेस्टमेंट अवेअरनेस कार्यक्रमाच्या अंतर्गत दैनंदिन जीवनात आर्थिक नियोजनाचे महत्त्व, बचतीची सवय, बँकिंग सुविधा ,डिजिटल व्यवहार व गुंतवणुकीच्या संधी .सदर विषयांवर मार्गदर्शन करण्यासाठी अनिरुद्ध जोग ( सेबी स्मार्ट ट्रेनर आर्थिक सल्लागार) बँकिंग क्षेत्रात 35 वर्षे अधिक अनुभव असलेले वरिष्ठ मार्गदर्शक यांना ऑनलाईन वेबिनारकरिता प्राचारण करण्यात आलं होतं त्यांनी विद्यार्थ्यांना योग्य व मोलाचे मार्गदर्शन केले.

जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे, प्राचार्य. डॉ.अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, सॉफ्ट स्किल ट्रेनर काजल वैद्य मॅडम, वाणिज्य विभाग प्रमुख. धनश्री चव्हाण, अर्थशास्त्र विभाग प्रमुख. मीना मुलीक, BAF विभाग प्रमुख. मयुरी कांबळे प्रा. मोहन गारे, प्रा. अशोक वीर ,प्रा. प्रवीण भालेराव व इतर प्राध्यापक यांचे सहकार्य सदर वेबिनारकरिता लाभले. 85 विद्यार्थ्यांनी या वेबिनारचा लाभ घेतला. या सर्वांच्या उपस्थिती सदर कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

# कोपरी वॉटरफ्रंट कामाच्या ठिकाणी प्रशासनाकडून दुरुस्तीचा निर्णय

## दोन वर्षात वास्तूंची दुरावस्था झाल्याने ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची काँग्रेसची मागणी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** कोपरी वॉटरफ्रंट प्रकल्पातील भ्रष्टाचार आणि निकृष्ट दर्जाचे कामकाज याबाबत काँग्रेसने उघड करून याबाबत थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली होती. या तक्रारीनंतर स्मार्ट सिटीच्या अधिकाऱ्यांनी प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी करून दूरवस्था झालेल्या वास्तूंची दुरुती कारण्याचा निर्णय घेतला आहे. या कामांचे दोषदायित्व कालावधी संपले असले तरी कंत्राटदाराच्या खर्चा मधून त्यांची दुरुस्ती करण्याचे आदेश दिले आहेत. मात्र मार्च २०२३ मध्ये तब्बल कोट्यवधींच्या खर्चातून उभारलेला कोपरी वॉटरफ्रंट प्रकल्प नागरिकांसाठी आकर्षण ठरला होता. पण अवघ्या दोन वर्षात ॲम्पी थिएटरच्या भिंतींना भेगा,स्टेजला तडे,गझिबोतील आसनांची मोडतोड, तोफांच्या चौथऱ्यांचे दगड उखडल्यासारखे गंभीर दोष समोर आले असल्याने तंत्रज्ञानाच्या पैशातून किंवा दुरुस्ती करून भागणार नाही तर निकृष्ट दर्जाचे काम करण्याचा थट्टा त्यावर संबंधित ठेकेदारावर काळ्या यादीत टाकण्याची कारवाई झाली पाहिजे असे आमची मागणी आहे.. एवढ्या मोठ्या प्रमाणात खर्च करूनही इतकं निकृष्ट काम झालं कसं, हा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

"दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का?" – काँग्रेसचा सवाल

काँग्रेस प्रवक्ते राहुल पिंगळे यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या निवेदनात या प्रकल्पातील संपूर्ण कामकाजाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. कोट्यावधी रुपये खर्च केलेल्या या प्रकल्पाचा "दोषदायित्व कालावधी संपला असला तरी एवढं नुकसान कसं झालं? आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई कधी होणार?" असा थेट सवाल काँग्रेसने केला आहे.प्रशासनाने कंत्राटदाराकडून स्वखर्चाने दुरुस्ती करून घेण्याचा दावा केला आहे. मात्र, काँग्रेसने या स्पष्टीकरणाला फोल ठरवत "हे भ्रष्टाचार झाकण्याचं पाऊल आहे. जर काम दर्जेदार झालं असतं तर एवढ्या लवकर दुरुस्तीची वेळच आली नसती," असा घणाघाती आरोप केला आहे.

स्थानिक नागरिकांनीही या प्रकल्पाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. "कराच्या पैशातून उभा केलेला प्रकल्प काही महिन्यांतच दुरावस्था होते, म्हणजे आमची फसवणूक झाली," असा रोष त्यांनी व्यक्त केला. सोशल मीडियावरही ठाणेकर महापालिकेच्या निष्काळजीपणावर सडकून टीका करत असून, "प्रत्येक प्रकल्प भ्रष्टाचाराच्या ओझ्याखाली का दबतो?" असा प्रश्न विचारत आहेत.

काँग्रेसच्या निवेदनामुळे या प्रकल्पातील भ्रष्टाचाराचा मुद्दा आता राज्य सरकारच्या पातळीवर पोहोचला आहे. मुख्यमंत्री फडणवीस चौकशीसंदर्भात कोणता निर्णय घेतात, याकडे ठाणेकरांचे लक्ष लागले आहे. नागरिकांची एकच मागणी आहे "भ्रष्टाचार करणाऱ्यांना वाचवू नका, कारवाई करा."

# टिटवाळ्यातील श्रीकृष्ण रुग्णालयावर बेकायदेशीर औषध साठ्याप्रकरणी छापा



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**टिटवाळा :** अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाने टिटवाळ्यातील डॉ. चेतन पाटील यांच्या श्री कृष्णा मल्टि स्पेशलिटी रुग्णालयावर मोठी कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईत रुग्णालयात असलेले परवानाधारक मेडिकल स्टोअर स्थलांतरित झाल्यानंतरही हे रुग्णालय बेकायदेशीरपणे औषधांचा साठा करत असल्याची गुप्त माहिती एफडीएला मिळाली आणि त्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

या छाप्यात, अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने रुग्णालयाच्या जागेतून सुमारे ५.१६ लाख रुपये किमतीची औषधे जप्त केली. ही औषधे कोणत्याही वैध परवान्याशिवाय साठवली जात होती, ज्यामुळे औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० अंतर्गत हा गुन्हा ठरतो. यामुळे ही कारवाई करण्यात आली.

औषध निरीक्षक श्रीमती राजश्री शिंदे आणि डोईफोडे यांनी ही कारवाई केली. या संपूर्ण कारवाईवर परिमंडळ ४ चे सहायक आयुक्त राजेश पं. चौधरी तसेच सह आयुक्त कोकण विभाग व्ही. टी.जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही यशस्वी कारवाई पार पडली. या प्रकरणी पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे. छाप्या दरम्यान जागेवर मोठ्या प्रमाणात औषधें होती. मात्र या कारवाईत कमी औषधे दाखविण्यात आली असून मोठ्या प्रमाणात साठ होता आणि अजून ही जागेवर औषधे असल्याची चर्चा टिटवाळा शहरात सुरू आहे. या कारवाईमुळे टिटवाळा शहरात अवैध्यरित्या औषधांची खरेदी-विक्री करणाऱ्या व्यवसायिकांचे मात्र धावे दनादले आहेत.




# क.डों.म.पा शिक्षण विभागातर्फे असाक्षरांना साक्षर होण्याची संधी



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** केंद्र शासन पुरस्कृत नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण विभाग योजना कार्यालय ,पुणे यांच्यामार्फत रविवार दिनांक 21/ 9 /2025 रोजी असाक्षरांची पुन्हा परीक्षा होत असून या परीक्षेत गेल्या दोन वर्षापासून म्हणजेच 2023 /24 तसेच 24 /25 या वर्षांमधील परीक्षेला अनुपस्थित राहिलेले असाक्षर तसेच उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक तेवढे गुण प्राप्त न झाल्याने साक्षर होऊ न शकलेले असाक्षर ,अशा असाक्षरांना या परीक्षेच्या मार्फत पुन्हा नव्याने साक्षर होण्याची संधी मिळत आहे.

कल्याण डोंबिवली मनपा शिक्षण विभागामार्फत या परीक्षेच्या नियोजनासाठी सर्व सीआरसी प्रमुखांची मिटिंग घेऊन त्या मीटिंगमध्ये संपूर्ण परीक्षेची माहिती देण्यात आली तसेच त्यांच्याकडून या परीक्षेसाठी जे असाक्षर आहेत त्यांची माहिती घेण्यात आली.क.डों. मनपातील एकूण 44 परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा होणार असून एकूण 153 स्त्रिया तसेच 45 पुरूष असे एकूण 198 असाक्षर या परीक्षेत प्रवेशित आहेत. या परीक्षेचे नियोजन करून संपूर्ण तयारी करणेबाबत योग्य त्या सूचना सीआरसी प्रमुखांना तसेच परिक्षा केंद्र संचालकांना सुद्धा देण्यात आलेल्या आहेत अशी माहिती प्रशासनाधिकारी भारत बोरनारे आणि शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांनी दिली आहे.



# आगरी सेनेच्या शहापूर तालुका महिला ग्रामीण तालुकाध्यक्ष पदी नमिता मसणे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : आगरी सेना या संघटनेच्या महिला शहापूर तालुका ग्रामीण तालुकाध्यक्ष पदी नमिता ज्ञानेश्वर मसणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

आगरी सेनेच्या महिला कार्यकर्त्या नमिता मसणे यांची संघटनेतील कार्याची दखल घेत त्यांच्यावर शहापूर तालुका ग्रामीण महिला तालुका अध्यक्षा पदाची जबाबदारी देत आगरी सेना प्रमुख राजाराम साळवी यांच्या हस्ते हे नियुक्ती पत्र देण्यात आले.

आगरी सेनेच्या ध्येय धोरणानुसार समाजाला न्याय हक्काची जाणीव करून ते मिळवून देण्याकरिता संघटनेचे कार्य करावे व तालुक्यात संघटना मजबूत करावे यासाठी ठाणे जिल्हा ग्रामीण प्रमुख नारायण अंदाडे, संघटनेचे कामगार एकता कार्याध्यक्ष प्रदीप साळवी यांनी नियुक्ती पत्र देऊन नियुक्ती केली आहे.

## शहापुरात भाजपाला झटका
# शेकडो कार्यकर्त्यांचा शरद पवार गटात प्रवेश

### खासदार बाळयामामा यांच्या उपस्थित पक्षप्रवेश




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**खर्डी** : शहापूर तालुक्यातील विविध जिल्हा परिषद आणि पंचायत समिती गणातील भाजपाच्या मुख्य पदाधिकाऱ्यांसह शेकडो कार्यकर्त्यांनी गुरुवारी खासदार बाळयामामा उर्फ सुरेश म्हात्रे यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला आहे. शरद पवार गटाचे जिल्हा समन्वयक संतोष शिंदे आणि तालुकाध्यक्ष नंदकुमार मोगरे यांच्या अथक प्रयत्नाने हा प्रवेश झाल्याने तालुक्यात शरद पवार गटाची ताकद वाढली आहे. शहापूर तालुक्यातील भाजपाचे मुख्य पदाधिकारी तालुका उपाध्यक्ष जयवंत बोडके,विभाग अध्यक्ष अनिस शेख,आदिवासी विकास सेलचे नाना निखडे यांच्यासह शेकडो महिला व पुरुष कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट या पक्षात जाहीर प्रवेश केला.मानकोली येथील राष्ट्रवादी कार्यालयात प्रवेश घेतलेल्या कार्यकर्त्यांना खासदार सुरेश म्हात्रे(बाळयामामा)यांनी पक्ष वाढीसाठी सूचना केल्या. तसेच पक्षात नव्याने दाखल केलेल्या कार्यकर्त्यांना बाळयामामा यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन त्यांच्यावर पक्ष संघटनाची जबाबदारी सोपवली आहे.यावेळी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे महिला आघाडी जिल्हाध्यक्ष रुपाली कराळे,तालुकाध्यक्ष कमल भोईर,शहराध्यक्ष अर्चना पवार,स्वाती भोंडवे,जयश्री कोरडे,शहराध्यक्ष विक्रांत शिंदे,अविनाश साबळे,ज्येष्ठ कार्यकर्ते दत्तात्रय दिनकर,नामदेव फर्डे,हरेश विशे,राम भोईर आदी उपस्थित होते.

# मोहने येथे संरक्षक भिंत कोसळून वाहनांचे नुकसान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : मोहने येथील विकास कॉलनी परिसरात शनिवारी सकाळी अचानक मोठी दुर्घटना घडली. एनआरसी कंपनीचे सध्याची मालकी असलेल्या अदानी समूहाची संरक्षक भिंत कोसळल्याने परिसरात उभ्या असलेल्या आठ ते दहा वाहनांचे प्रचंड नुकसान झाले. शुक्रवारी पहाटे अदानी समूहाची सुमारे ६० ते ७० फूट लांबीची भिंत एकाच वेळी कोसळली. या दुर्घटनेत पाच ते सहा रिक्षा चिरडून गाड्यांचे पूर्ण नुकसान झाले. याशिवाय चार दुचाकी व एक चारचाकी वाहनही भिंतीखाली दबून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अपघात पहाटे झाल्याने अपघाताच्या



वेळी परिसरात काही नागरिक उपस्थित नव्हते त्यामुळे सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. तरीदेखील या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

50 ते 60 वर्ष जुन्या असलेल्या एनआरसी कारखान्याच्या जमिनीची ही संरक्षक भिंत होती कारखाना बंद झाल्यानंतर कारखान्याची संपूर्ण जमीन रहेजा बिल्डर्सने विकत घेतल्यानंतर ही जमीन रहेजा कडून अदानी समूहाने घेतली आहे. या जमिनीवर असलेली संरक्षक भिंत जीर्ण झाली असून अनेक ठिकाणी भिंत कोसळून दुर्घटना होत आहेत. या अगोदरही आंबिवली स्टेशन येथे भिंत कोसळून रिक्षातील प्रवाशांना मोठी इजा झाली होती. या भिंतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येत नसून अशा प्रकारच्या घटना सातत्याने वाढत आहेत असा आरोप नागरिकांनी केला गोरगरीब रिक्षाचालकांना तसेच इतर गाडी मालकांना तातडीने मदत करण्याची मागणी केली आहे.

# दत्तात्रय घोलप यांचा जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्काराने गौरव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ओतूर** : पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ, पुणे जिल्हा शिक्षक लोकशाही आघाडी, पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षिका संघ, पुणे जिल्हा उच्च माध्यमिक शिक्षक संघ तसेच पुणे जिल्हा सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा जिल्हास्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार पुष्पावती विद्यालय, डिंगोरे येथील उपशिक्षक मा. दत्तात्रय ज्ञानदेव घोलप यांना सपत्निक प्रदान करण्यात आला.

हा दिमाखदार सोहळा आळेफाटा येथील तुलसी मंगल कार्यालयात पार पडला.

या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पीडीएफ अध्यक्ष जी. के. थोरात,



महाराष्ट्र राज्य पीडीएफ कार्यवाह केरभाऊ ढोमसे, पुणे जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ अध्यक्ष पंकज घोलप, पुणे जिल्हा पीडीएफ अध्यक्ष सोमनाथ भंडारे, पुणे जिल्हा माध्यमिक महिला शिक्षक संघ अध्यक्षा स्नेहल बाळसराम, महाराष्ट्र राज्य शिक्षक संघ प्रतिनिधी प्रदीप गाढवे, जितेंद्रकुमार थिटे, हनुमंत चव्हाण, यादव चासकर, तानाजी झेंडे, ज्योती दहितूले, विजय घोलप यांसह पुणे जिल्ह्यातील सर्व माध्यमिक शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच ग्रामविकास मंडळ अध्यक्ष अनिल तांबे, उपाध्यक्ष काकासाहेब तांबे, राजू डुंबरे, खजिनदार रघुनाथ तांबे, सचिव प्रदीप गाढवे, सहसचिव पंकज घोलप, पुष्पावती विद्यालय डिंगोरेचे मुख्याध्यापक शरद माळवे व शिक्षक प्रतिनिधी वैभव देशमुख यांनी दत्तात्रय घोलप सरांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत
# मुरबाड तालुक्यात ग्रामसभांचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : महाराष्ट्र शासन,जिल्हा परिषद ठाणे, पंचायत समिती मुरबाड व तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७/०९/२०२५ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे,मा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे ,गटविकास अधिकारी श्रीम.डॉ.लता गायकवाड,सहा. गटविकास अधिकारी चिंतामण लोहकरे या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली मुरबाड तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसभांचे यशस्वी आयोजन करण्यात आले.सदर ग्रामसभेमध्ये खालील विषय प्रामुख्याने घेण्यात आले.

१) दिनांक १७/०९/२०२५ ते ३१/१२/२०२५ या कालावधीत सर्व ग्रामपंचायतींमध्ये मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामध्ये सक्रीया सहभाग घेणे/राबविणे व सुशासनयुक्त पंचायत लोकाभिमुख सक्षम पंचायत प्रशासन) तयार करणे.
२) सक्षम पंचायत(स्वनिधी,C.S.R व लोकवर्गणीतुन पंचायतराज संस्थाना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे
३) जल समृद्ध ,स्वच्छ व हरित गाव निर्माण करणे.
४) मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करणे.
५) गावपातळीवरील संस्था सक्षमीकरण करणे.
६) उपजीविका विकास, सामाजिक न्याय.
७) लोकसहभाग व श्रमदानाच्या माध्यमातुन लोकचळवळ निर्माण करणे.
८) नाविण्यपुर्ण उपक्रम राबविणे.

उपरोक्त विषयावर अभियान काळात उक्तृष्ट काम करणा-या ग्रामपंचायतींना,पंचायत समितीला व जिल्हा परिषदेला तालुकास्तर,जिल्हास्तर,विभागस्तर व राज्यस्तरावर मोठ्या प्रमाणवर पुरस्कार महाराष्ट्र



शासनाच्या वतीने दिले जाणार आहेत व सत्कारीत करण्यात येणार आहेत.तसेच या उपक्रमाचा भाग म्हणुन गटविकास अधिकारी श्रीम.डॉ.लता गायकवाड यांच्या हस्ते ग्रामपंचायत झाडघर येथे तालुकास्तरीय अभियानाचे उद्घाटन करण्यात आले.उपक्रमांच्या माध्यामातुन आज विविध ग्रामपंचायतमध्ये मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली व गावपातळीवर अभियान दरम्यान विविध समित्या व ग्राम समित्याच्या स्थापन करण्यात आल्या. तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या माध्यमातुन प्रभातफेरी काढुन मोठ्या प्रमाणात अभियान यशस्वी साठी जनजागृती करण्यात येवुन लोकसहभाग वाढवण्यात आला व सर्व ग्रामपंचायतमध्ये थेट प्रक्षेपण कार्यक्रम मा.मुख्यमंत्री , मा.ग्रामविकास मंत्री यांचा कार्यक्रम दाखविण्यात आला.तसेच ग्रामसभा यशस्वी करण्यात मा.सरपंच,ग्रामपंचायत अधिकारी,मा. उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य,ग्रामस्थ,गावस्तरीय कर्मचारी अधिकारी,सर्व विस्तार अधिकारी,संपर्क अधिकारी व सर्व विभाग प्रमुख यांचे मोठ्या प्रमाणात योगदान होते.सदर अभियान राबविण्यामध्ये ग्रामपंचायत विस्तार अधिकारी व RGSA टिम यांनी उत्कृष्ट नियोजन केले होते.

# भिवंडी पालिका आयुक्तांकडून दोन कर्मचाऱ्यांची उचलबांगडी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : केंद्र शासन पुरस्कृत "दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत" शहरी गरीब लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी कार्यरत असलेले कर्मचारी कैलास राजधर पाटील व संजय ठाकरे यांना कार्यमुक्त कारण्यासासाठी लेखी पत्र महानगरपालिकेचे आयुक्त अनमोल सागर यांनी राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान नगर परिषद प्रशासन संचालनालयाच्या सह आयुक्तांना दिले आहे.

केंद्र शासन पुरस्कृत "दीनदयाळ अंत्योदय योजना-राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत" (एनयूएलएम) शहरी गरीब लाभार्थ्यांना विविध उपांगांतर्गत शहरांमध्ये उपजीविका आधारित सेवा सुविधा देण्यासाठी दोन शहर अभियान व्यवस्थापक कंत्राटी करार पद्धतीने मानधन तत्वावर नियुक्त केले होते. कैलास राजधर पाटील व संजय ठाकरे अशी शहर अभियान व्यवस्थापकांची नांवे असून त्यांची नियुक्ती दि.अ.यो. राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान




नगरपरिषद प्रशासन संचालनालय कार्यालया मार्फत भिवंडी महानगर पालिकामध्ये करण्यात आली होती.

मात्र भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमध्ये कैलास पाटील व संजय ठाकरे यांचे कामकाज समाधानकारक नाही तसेच त्यांना वेळोवेळी सोपवून दिलेले कामकाज करण्यास देखील ते अकार्यक्षम असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे एनयूएलएम विभागामधिल सोपविण्यात आलेली कामे वेळेवर त्यांनी केलेली नाहीत. तसेच दोघेही वारंवार गैरहजर राहतात आणि मागील अनेक वर्षा पासुन त्यांच्याकडे सोपविलेले फेरीवाला सर्वेक्षण देखील त्यांच्याकडुन पूर्ण करण्यात आलेले नाही. बायोमेट्रिक (फेरीवाला) सर्वेक्षण, ना-फेरीवाला धोरण अंमलबजावणी, बेघर निवारा केंद्र देयक अदा करणे इ. बाबीमध्ये व शासनाच्या विविध योजनेच्या कामकाजात त्यांनी टाळाटाळ केली आहे. त्यामुळे महानगरपालिकेमध्ये कैलास राजधर पाटील संजय ठाकरे व्यवस्थापक यांची या महानगरपालिकेतून उक्त सेवा समाप्त करण्यात येत असून याव्दारे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमधून कैलास राजधर पाटील व संजय ठाकरे व्यवस्थापक यांना कार्यमुक्त करण्यात येत आहे,असे लेखी पत्र भिवंडी पालिकेचे आयुक्त सागर यांनी देत त्यांच्या जागी दोन नवीन व्यवस्थापकांची भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेमध्ये नियुक्ती करण्यात यावी,असे पत्रात नमूद केले आहे.

# पेण- देवआळी येथे स्वच्छता अभियान

### फॅशन ड्रेस व मास्क मेकिंग स्पर्धा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : जन सामान्यांमध्ये प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून विविध सरकारी योजना, स्वच्छता जनजागृती माहिती, आरोग्य विषयक जन जागृती, कौशल्य विकास उपक्रम आदिंना प्रोत्साहन देण्याच्या उददेशाने जन शिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून गुरुवार 18 सप्टेंबर 2025 रोजी "पेण-देवआळी" येथे "स्वच्छतेवर फॅशन ड्रेस व मास्क मेकिंग स्पर्धा" आणि सार्वजनिक स्वच्छता जनजागृती करण्यात आली, तसेच कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना कार्यक्रमाप्रसंगी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सौ. कल्पना म्हात्रे यांच्या माध्यमातून स्वछ्तेची शपथही देण्यात आली. "कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार" यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व स्वच्छता, आरोग्य व जनजागृती उपक्रमाचा एक भाग म्हणून "पेण-देवआळी" ह्या ठिकाणी "स्वच्छतेवर फॅशन ड्रेस व मास्क मेकिंग स्पर्धा" आणि सार्वजनिक स्वच्छता जनजागृती या उपक्रमाप्रसंगी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी सौ. कल्पना म्हात्रे, प्रशिक्षिका सौ. माधवी देव, सौ. मयुरी पाटील, सौ. आरती सुबा व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते आदि कर्मयोगी अभियानाचा शुभारंभ

## कलोते-विनेगाव व तासगाव आदिवाडी येथे अभियानाचा शुभारंभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**रायगड** : आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावून त्यांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनवण्यासाठी केंद्र सरकारने 'धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानांतर्गत आदी कर्मयोगी उत्तरदायी शासन हा राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रम सुरू केला आहे. रायगड जिल्ह्यातील 14 तालुक्यांमधील 113 गावांमध्ये हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविला जाणार आहे. यामुळे जिल्ह्यात आदी कर्मयोगी उत्तरदायी शासन कार्यक्रमाला सुरुवात झाली असून रायगड जिल्ह्यातील आदिवासी पाड्यात आज विकासाची नवी पहाट उगवली आहे. या आदि कर्मयोगी अभियानाचा शुभारंभ (दि.17 सप्टेंबर रोजी) खालापूर तालुक्यातील कलोते-विनेगाव



कातळाची वाडी तसेच माणगाव तालुक्यातील तासगाव आदिवासी वाडी येथे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याहस्ते संपन्न झाला.

या कार्यक्रमाला मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे, उपविभागीय अधिकारी माणगाव संदीपान सानप, सानप, तहसीलदार श्री.काळे, गटविकास अधिकारी श्रीम. शुभदा पाटील, खालापुर तालुक्याचे तहसीलदार. अभय चव्हाण, निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी तसेच ब्लॉक मास्टर ट्रेनर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी श्री.जावळे म्हणाले की, आदि कर्मयोगी अभियान, महसूल विभागाचे राजस्व अभियान व ग्रामविकास विभागाचे मुख्यमंत्री पंचायतराज अभियान यांचा उद्देश तळागाळातील आदिवासी बांधवांना सशक्त करणे व गावांचा सर्वांगीण विकास साधणे त्याचप्रमाणे शासनाच्या सर्व योजनांचा लाभ पोहोचवणे हा आहे." गावकऱ्यांनी विकासाच्या प्रवासात सक्रिय सहभाग नोंदवावा,असे आवाहनही त्यांनी उपस्थितांना केले. या कार्यक्रमादरम्यान जिल्हाधिकारी श्री.जावळे यांच्याहस्ते धरती आबा योजनेंतर्गत दाखल्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान व आनंद झळकत होता. आदिवासी समाजाला विकासाच्या प्रवाहात सामील करून घेणाऱ्या या अभियानामुळे गावात आशा व आत्मविश्वासाची नवी ऊर्जा निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प अधिकारी आत्माराम धाबे यांनी केले. तर सहायक प्रकल्प अधिकारी श्रीम. तेजस्विनी गलांडे यांनी गाव विकास आराखडा तयार करण्याबाबत मार्गदर्शन केले.

## "स्वस्थ नारी – सशक्त परिवार अभियान" अंतर्गत
# बदलापूर येथे विशेष तज्ञ शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : : "स्वस्थ नारी – सशक्त परिवार अभियान" या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमांतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र, बदलापूर येथे विशेष तज्ञ शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत आरोग्य सेवा उपक्रमाचा लाभ घेतला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नगरसेवक अनिलजी भगत यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुण्या म्हणून नीता खोतरे, अतिरिक्त गटविकास अधिकारी उपस्थित होत्या. प्राथमिक आरोग्य केंद्र बदलापूर वैद्यकीय अधिकारी डॉ प्रशांत कनोजा व डॉ अश्विनी वाणे, औषध निर्माण अधिकारी आर वाय पाटील , आरोग्य सहायक बोरकर, शिबिरासाठी विविध तज्ञ डॉक्टर आणि संस्थांनी मोलाची सेवा बजावली. यात दंत शल्यचिकित्सक डॉ. अर्चना पवार, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. अरुणा बेल्लुरे, बालरोगतज्ज्ञ डॉ. हेमंत काटकर, मानसोपचारतज्ज्ञ डॉ. रविंद्र चव्हाण, शमन कॅन्सर टीममधील डॉ. शीतल व सहकारी, एम.एम. युनिट आणि मॅमोग्राफी युनिटच्या डॉ. सदावर्ते व सहकारी, वत्सल्य आयसीएमआर मुंबईच्या डॉ. प्रेरना पाटील व सहकारी तसेच ईशा नेत्रालय व टीम यांचा समावेश होता.या शिबिरामध्ये एकूण १६८ रुग्णांनी (१३४ महिला व ३४ पुरुष) सहभाग घेतला. विविध तपासण्या करण्यात आल्या ज्यामध्ये स्त्रीरोग तपासणी ४५ महिला, नेत्र तपासणी २१ रुग्ण, दंत तपासणी २६ रुग्ण, बालरोग तपासणी २१ बालरुग्ण, मानसोपचार तपासणी १२ रुग्ण, पॅप स्मीअर तपासणी १३ महिला व साय-टीबी तपासणी १६ रुग्णांचा समावेश होता. महिलांच्या आरोग्य तपासण्या, कॅन्सर तपासणी, नेत्र तपासणी, दंत तपासणी व बालरोग तपासणीमुळे स्थानिक नागरिकांना महत्त्वपूर्ण सुविधा मिळाली. या कार्यक्रमावेळी आशा स्वयंसेविका संजीवनी पाटील यांनी काढलेली सुंदर रांगोळी आकर्षणाचे केंद्र ठरली.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं. २०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं. २०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई ▪ नवी मुंबई ▪ ठाणे ▪ पालघर ▪ रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024